

# डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजमध्ये व्यसनमुक्ती प्रबोधन कार्यक्रम उत्साहात

**जयसिंगपूर/वृत्तसेवा**

डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे १७ नोव्हेंबर रोजी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, कोल्हापूर आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (छडड) विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती सामाह निमित्त व्यसनमुक्ती प्रचार, प्रसार व प्रबोधन कार्यक्रम अत्यंत उत्साहात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रेया मगदूम हिने पार पाडले. प्रारंभी प्रा. प्रणील तोरस्कर यांनी प्रास्ताविकातून प्रमुख पाहुणे अॅड. सुरेश साकटे (नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, कोल्हापूर जिल्हा संघटक व पुणे विभाग प्रमुख) यांच्या सामाजिक कार्याची, व्यसननिर्मूलनातील त्यांच्या योगदानाची आणि जनजागृती मोहिमेतील त्यांच्या भूमिकेची विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने संपन्न झाले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार एस. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रमुख पाहुणे अॅड. सुरेश साकटे यांनी आपल्या प्रभावी मार्गदर्शनपर भाषणात आजच्या युवा पिढीसमोरील व्यसनाचे वाढते संकट अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, आज उद्योगधंदा करण्याऐवजी अनेक तरुण बिडी-सिगारेट, तंबाखू किंवा दारूच्या आहारी जाताना दिसतात. समाजातील हे चित्र चिंताजनक असून, व्यसनाधीनतेमुळे उध्वस्त झालेल्या युवकांना योग्य मार्ग दाखवण्यासाठी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य सातत्याने कार्यरत आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले तसेच स्वतः व्यसनमुक्त राहून समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवण्याची प्रेरणादायी हाक दिली. या कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हाईस-चेअरपर्सन अॅड. डॉ. सोनाली मगदूम आणि प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या एनएसएस विभाग प्रमुख प्रा. प्रणील तोरसकर आणि प्रा. काशिनाथ हुलवान यांनी केले.